# पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन

प्रिय बंधू आणि भगिनींनो,

दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी ऑल इंडिया ओएनजीसी ट्रेड युनियन्स कोऑर्डिनेशन कमिटी (एआयओटीयूसीसी) ने ओएनजीसी व्यवस्थापनासोबत बी.एस. नेगी भवन, ओएनजीसी देहरडून येथे क्रेडिट मेडिकल फॅसिलिटी मधील केलेले बदल मागे घेण्याबाबत व्यापक चर्चा झाली. ही बैठक ओएनजीसीचे माननीय संचालक -एच.आर(**Director-HR**) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

बैठकीदरम्यान, सर्व सरचिटणीसांनी(**General Secretaries**) व्यवस्थापनाच्या एकतर्फी निर्णयावर तीव्र आक्षेप घेतला आणि एकत्रित निषेध सादर केला.

आम्ही तुम्हाला कळवू इच्छितो की, व्यवस्थापनाने क्रेडिट मेडिकल फॅसिलिटी मागे घेण्याबाबत पुन्हा विचार करण्यास सहमती दर्शविली आहे. शिवाय, व्यवस्थापनाने लवकरच पॅथॉलॉजी चाचण्यांची क्रेडिट फॅसिलिटी पुन्हा सुरू करण्यास सहमती दर्शविली आहे आणि योग्य वेळी ओपीडी, डेंटल आणि फिजिओथेरपी सेवांसाठी क्रेडिट पुन्हा सुरू करण्याच्या व्यवहार्यतेचा आढावा घेतला जाईल असे व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले. त्याचवेळी महाराष्ट्रातील आपल्या कामगार बांधवांची पॅनल हॉस्पिटल ची समस्या पेट्रोलियम एम्प्लॉइज युनियन चे जनरल सेक्रेटरी श्री संतोष पाटील साहेब तसेच **DGS** श्री संदीप रेवंडकर साहेब यांच्याकडून मुद्देसूद पणे मांडण्यात आली.

ऑफशोअर मध्ये काम करण्याकरिता आपले कामगार बांधव महाराष्ट्राच्या विवध भागांमधून येत असतात परंतु मुंबई वगळता महाराष्ट्राच्या इतर भागांमध्ये पॅनल हॉस्पिटल नसल्यामुळे तेथील आपल्या कामगारांना विविध उपचारांकरिता तसेच पीएमई सारख्या अनिवार्य प्रक्रियेकरिता ऑफशोअर वरून आल्यावर आपला वेळ तसेच पैसे खर्च करावे लागतात आणि त्याकरिता मुंबई पुणे येथे येणे बंधनकारक होते तसेच जिल्ह्यामध्ये कोणतेही उपचार कमी खर्चात होण्याचा पर्याय उपलब्ध असताना देखील अवास्तव मुंबईला येऊन अवाजवी खर्च करून उपचार घ्यावे लागतात व त्याचबरोबर आस्थापनेचा देखील हॉटेल करिता व इतर संबंधित खर्च वाढतो.

आपल्या कामगारांनी त्यांच्याच जिल्ह्यामध्ये नॉन पॅनल हॉस्पिटल मध्ये मुंबई पेक्षा कमी खर्चात जरी उपचार घेतले तरी बिल क्लिअर करताना मात्र के ई एम हॉस्पिटल चे दर लावण्यात येतात ज्यामुळे आपल्या बांधवांचे कमी खर्चात उपचार होऊन देखील त्यावर अतिरिक्त नुकसान सहन करावे लागते. यावर उपाय म्हणजे या सर्व भागांमध्ये पॅनल हॉस्पिटल असल्यास या सर्व समस्यांचे समाधान होईल.

या बाबीचा डायरेक्टर एच आर श्री मनीष पाटील साहेब यांनी दखल आपल्याला ही बाब आता निदर्शनास आल्याने सांगितले व त्यावर त्वरित कमिटी गठन करून प्रलंबित असलेले सर्व हॉस्पिटल लवकरात लवकर पॅनल वर घेण्याचे व सदर विषय लवकरात लवकर सोडवण्याची निर्देश दिले.

याव्यतिरिक्त, आम्हाला तुम्हाला कळवण्यास आनंद होत आहे की, व्यवस्थापनाने आर अँड पी(**R&P**) चा आढावा घेण्यासाठी एक कार्य समिती(**Working Committee**) स्थापन करण्यास सहमती दर्शविली आहे. त्यामुळे आर अँड पीचे प्रश्न आता जलदगतीने सोडवले जातील.

याव्यतिरिक्त, व्यवस्थापनाने मुख्य पीपीई(**PPE**) वस्तूंची खरेदी लवकरात लवकर करण्यास सहमती दर्शविली आहे.

टीबीएफओच्या(**TBFO**) वेतन सुधारणा आणि टीबीएफओच्या निवृत्ती कालावधीत वाढ यावर देखील विशेष चर्चा करण्यात आली आणि व्यवस्थापन त्यावर सकारात्मक आहे. पुढील एमसीओडी(**MCoD**) बैठकीत ह्या विषयावर अंतिम निर्णय घेतला जाईल असे व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले.

वर्ग-चतुर्थ कर्मचाऱ्यांच्या(**Class IV Employees**) पदांच्या पुनर्रचनेबाबत देखील व्यवस्थापनाकडून मान्यता देण्यात आली आहे.( फायरमन,सिक्युरिटी वगळता कारण या कॅडर चे अपग्रेडेशन ची मागणी यापूर्वीच केलेली आहे आणि येणाऱ्या **R & P** मीटिंग मध्ये निर्णयाधिन आहे.)

२१ दिवसांच्या मान्सून काळातील **duty** करिता देखील विचारणा करण्यात आली परंतु पेट्रोलियम एम्प्लॉइज युनियन कडून याला ठाम विरोध दर्शवण्यात आला..

धन्यवाद..!

संतोष ज पाटील
जनरल सेक्रेटरी
पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन,ओएनजीसी, मुंबई.